**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - पिटर गॅब्रीयल फर्नांडीस
वय - ५० वर्षे
व्यवसाय - रिक्षा व्यवसाय
रा/ने - रेवतळे सागरी महामार्ग, ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. शुभम विलास बांदेकर हा आमच्या शेजारी राहत असल्याने मी त्याला ओळखतो. दि. १९/०३/२०२५ रोजी मी रात्री माझ्या घराचा गेट लावण्यासाठी गेलो असता गेटच्या समोर शुभम बांदेकर, अक्षय भगत व ललीत भगत हे दारु पित होते. मी त्यांना दारु पित असल्याबाबत विचारणा केली असता ते मला मारण्यासाठी अंगावर धावून आले. मला शुभम बांदेकर याने दांडयाने डोक्यावर मारले. तसेच अक्षय भगत यांनी पाठीवर हाताने मारले. ललीत भगत याने देखील मला डाव्या हातावर मारले. मी पोलीसांना फोन करुन बोलावून घेतले. पोलीस आल्यावर ते तिघेही पळून गेले. पोलीसांनी मला पोलीस स्टेशन येथे नेले माझी फिर्याद नोंदविली. त्यानंतर मला वैद्यकिय तपासणीसाठीमालवण ग्रमिण रुग्णालय येथे नेले. साक्ष्झीदारास दि. १९/०३६/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>नि.क्र.पी१/पीडब्लू१</u>** देण्यात येते. तसेच छापील फिर्यादला **<u>नि.क्र.पी२/पीडब्ल्यू१</u>** देण्यात येते.आरोपीस दाखविण्यास मी त्यांना ओळखू शकतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

२. मला ज्या दांडयाने मारहाण केली तो दांडा दाखविल्यास मी ओळखू शकतो. सदर दांडा हा आकाशी झाडाचा होता. त्याची लांबी अंदाजे ३ ते ४ फूट इतकी आहे. साक्षीदाराने पहिल्यांदा सांगितले की, त्यांना दाखविण्यात आलेला मुद्देमाल आकाशीचा नाही. साक्षीदाराने मुद्देमाल पाहून परत सांगितले की, ज्या दांडयाने मला मारहाण झाली तो हाच आहे. फिर्यादीने मुद्देमाल ओळखला म्हणून त्यास **<u>एम.ओ.क्र.१</u>** देण्यात येते. दुसऱ्या दिवशी पोलीस घटनेच्या ठिकाणी आले होते. पोलीसांसोबत पंच होते. पोलीसांनी पंचनामा केला व ज्या दांडयाने मला मारहाण झाली तो दांडा जप्त् केला.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एस.के.जाधव यांचेमार्फत</u>**

३. मी २५ वर्षाहून अधिक काळापासून रिक्षाचा व्यवसाय करत आहे. भंडारी हायस्कूलच्या शेजारी मी रिक्षा स्टॅन्डवर मी रिक्षा लावतो. हे म्हणणे खरे आहे की, मी रिक्षा चालक असल्यामुळै मला मालवण मधील वाडयांची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, रेवतळे हा स्वंतंत्र वाडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी मी राहतो ते ठिकाणी सागरी महामार्गाला लावून आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळ सागरी महामार्ग आणि धुरीवाडा असा लागतो. माझे मुळ घर रेवतळयामध्ये चर्चच्या शेजारी आहे. मी माझ्या मुळ घरात सन २०११ पासून राहत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, देवूळवाडा ब्रीज ते मालवण कोळंब जाणारा रोड हा सागरी महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सागरी महामार्गावर वर्दळ सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळापूसन हाकेच्या अंतरावर एकाच मालकाचे दोन भंगार दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या भंगारीच्या दुकानामध्ये भंगारवाले राहतात. हे म्हणणे खरे आहे की,कथीत घटनास्थळापासून हाकेच्या अंतरावर ढेलम कुटूंबियाचे राहत घरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या २०० फूटाचे अंतरावर माडी छप्पर विक्रीचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, रात्रीच्या वेळेस माडी छप्पर दुकानामध्ये लोकांची ये जा असते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळापासून ५ मिनिटाच्या अंतरावर सायबा हॉटेल व मालवण मेजवान हॉटेल आहे व त्या हॉटेलला जाणाऱ्या लोकांची रात्रीची रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, ढोलमच्या घरापासून त्या साईडला जाणाऱ्या रस्त्यावर म्हणजेच कथीत घटनास्थळापासून जाणाऱ्या रस्त्यावर स्ट्रीट लाईट नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, म्हणून त्या रस्त्यावर काळोख असतो.

मध्यंतराची वेळ झाल्याने साक्षीदाराचा उलट तपास तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.

दि. ११/०३/२०२६

**<u>मध्यंतरानंतर आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एस.के.जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

५. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळाच्या रस्त्यावर काळोख असल्याने येणारे जाणारे किंवा थांबणारे लोक दिसून येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी सागरी महामार्गाची रस्त्याचीकडा संपते तेथून माझे घराचे गेट २२ फूट अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कंपाउंडच्या गेटपासून ४० ते ४५ फूट अंतरावर माझे घराचे बांधकाम आहे. हे म्हणणे खरे आहे की, रोडवर कोण आहे हे बघण्यासाठी मला माझ्या घरातून बाहेर यावे लागते.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझे घरातील इतर सदस्यांशी पटत नसल्याने मी माझ्या मुळ घरात न राहता कथीत घटनास्थळावरील घरात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळापासून मालवण पोलीस स्टेशन येथे येण्यासाठी रिक्षाने ८ ते १० मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, तसेच कथीत घटनास्थळापासून मालवण रुग्णालय येथे येण्यासाठी रिक्षाने ५ ते ७ मिनिटे लागतात.

७. माझ्या म्हणण्याप्रमाणे पोलीस मी फोन केल्यानंतर कथीत घटनास्थळावर १० ते १५ मिनिटात आले. पोलीस कथीत घटनास्थळी आल्यानंतर त्यांचे व माझे पाच मिनिटे बोलणे झाले. माझ्या म्हणण्याप्रमाणे त्यानंतर आम्ही १० मिनिटात मालवण पोलीस स्टेशन येथे पोहोचलो. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी अर्धा ते पाऊण तास पोलीस स्टेशनमध्ये होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशन मध्ये कथीत फिर्याद देवून मी घरी गेलो.

८. हे म्हणणे खरे आहे की, सागरी महामार्गापासून कथीत घटनास्थळाचा गेट हा खडबडीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या परिसरात देखील खडबडीत जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दारु पिण्याचे व्यसन आहे. मी अविवाहित असून घरी एकटाच राहतो.

९. मी पोलीसांना जबाब देताना ' शुभम विलास बांदेकर हा माझ्या शेजारी राहणारा असल्याने मी त्याला ओळखतो ' असे सांगितले होते. सदर बाब माझे फिर्यादमध्ये का नमूद

नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना 'दि. १९/०३/२०२५ रोजी शुभम बांदेकर, अक्षय भगत व ललित भगत माझ्या गेटच्या समोर दारु पित होते ' असे सांगितले होते. सदर बाब माझ्या फिर्यादमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना ' मी त्यांना दारु पित असलेबाबत विचारणा केली असता ते मला मारण्यासाठी अंगावर धावून आले ' असे सांगितले होते. सदरचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना शुभम बांदेकर यांनी दांडयाने माझ्या डोक्यावर मारले व अक्षय भगतने हाताने पाठीवर मारले आणि ललित भगत यांनी देखील डाव्या हातावर मारले असे सांगितले होते. सदरचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना ' मी पोलीसांना फोन करुन बोलवून घेतले, पोलीस आल्यावर ते तिघेही पळून गेले ' असे सांगितले होते. सदरचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, कथीत एम.ओ.नं.१ चे संपुर्ण वर्णन फिर्यादमध्ये नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी कृषी विद्यापिठातून कृषी संदर्भात कोणतेही ज्ञान घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कृषीचे ज्ञान नसल्यामुळे चार ते पाच काठयांपैकी कोणती काठी कोणत्या झाडाची आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दांडा व काठी यामधील फरक मला समजतो. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या साक्षी पिंजऱ्यामध्ये उभा आहे, त्या पिंजऱ्याला असलेली गोलाकार भरीव लाकडाला दांडा असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, घराच्या वाशाला दांडे असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं. १ दांडा नाही. ती काठी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दांडयाने मला कथीत मारहाण झाली तो दांडा पोलीसांनी या केसमध्ये हजर केलेला नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, कोर्टात आरोपीच्या बाकडयावर बसलेल्या शुभम विलास बांदकर याच्याशी कथीत घटनेपुर्वी माझी वाकडीक नाही. हे म्हणणे खरे आहे की, ललीत दशरथ भगत व अक्षय दशरथ भगत यांच्याशी कथीत घटनेपुर्वी माझे बोलणे व ओळख् नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी तपासकामी आरोपींची ओळख परेड घेतली नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०३/२०२५ रोजी मी दारु पिवून घरी जात असताना कथीत घटनास्थळाच्या रस्त्यावर पडल्यामुळे माझ्या हातावर, डोक्यावर व पाठीवर मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, गडबडीत रिक्षातून उतरताना रिक्षाचा टप डोक्याला लागतो. हे म्हणणेखरे नाही की, शुभम विलास बांदकर, अक्षय दशरथ भगत व ललित दशरथ भगत यांचा कथीत गुन्हयाशी काही संबंध नसताना मी त्यांच्याविरुध्द खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, शुभम विलास बांदेकर हा आमच्या शेजारी राहत असल्याने मी त्याला ओळखतो. दि. १९/०३/२०२५ रोजी मी रात्री माझ्या घराचा गेट लावण्यासाठी गेलो असता गेटच्या समोर शुभम बांदेकर, अक्षय भगत व ललीत भगत हे दारु पित होते. मी त्यांना दारु पित असल्याबाबत विचारणा केली असता ते मला मारण्यासाठी अंगावर धावून आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला शुभम बांदेकर याने दांडयाने डोक्यावर मारले, तसेच अक्षय भगत यांनी पाठीवर हाताने मारले, ललीत भगत याने देखील मला डाव्या हातावर मारले, मी पोलीसांना फोन करुन बोलावून घेतले, पोलीस आल्यावर ते तिघेही पळून गेले, पोलीसांनी मला पोलीस स्टेशन येथे नेले माझी फिर्याद नोंदविली, त्यानंतर मला वैद्यकिय तपासणीसाठी मालवण ग्रमिण रुग्णालय येथे नेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पंचनामा केला व माझ्या समक्ष मुद्देमाल जप्त केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत पंचनामा केल्यानंतर मला पोलीसांशी भेटण्याचा योग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.